# MARATHI DEPARTMENT

Title of Programme : **विचारवेध निबंध स्पर्धा पारितोषिक वितरण कार्यक्रम**

Name of Organizing Department: **विचारवेध पुणे व मराठी विभाग**

Name of the Coordinator of the Programme: Dr. Sanjay Shinde

Date of the Programme: १४ जानेवारी २०२०

Venue: Hutatma Rajguru Mahavidhyalay, Rajgurunagar

Target Group: कला, वाणिज्य व विज्ञान शाखेतील सर्व विद्यार्थी

Number of Participants: १५

Name of Resource Person: - डॉ. संजय शिंदे

Total Expenditure for the Programme : ४०००/—

Source of Funding: विचारवेध पुणे

**Report: खुली निबंध स्पर्धा अहवाल**

हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात दि. १ ते १५ ऑक्टोबर २०१९ दरम्यान विचारवेध, पुणे आणि मराठी विभागाच्या वतीने खुली निबंधस्पर्धा आयोजित करण्यात आली. या स्पर्धेत १५ स्पर्धकांनी सहभाग घेतला. या स्पर्धेसाठी गुगल माझा गुरू, जागतिकीकरण आणि पर्यावरण, वित्तीयभांडवलाची जागतिक मिरासदारी आणि जग कुठे व भारत कुठे? असे चार विषय ठेवण्यात आले होते. ही स्पर्धा सर्व वयागटांसाठी खुली होती. तसेच स्पर्धकांना वय, शिक्षण, अशी कोणतीही अट नव्हती. या स्पर्धेत सहभागी झालेल्या स्पर्धकांचे निबंध विचारवेध पुणे या संस्थेकडे अंतिम परीक्षणासाठी पाठविण्यात आले होते. या स्पर्धेत महाविद्यालयातील डॉ. संजय शिंदे, कु. शितल रौंधळ, कु. चैताली बोरकर यांसह सुमारे ८ विद्यार्थ्यांना पारितोषिक देऊन गौरविण्यात आले.

निबंध स्पर्धेचा पारितोषिक वितरण समारंभ खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टेपाटील, विचारवेध पुणे या संस्थेचे संचालक मा. आनंद करंदीकर, मा. सरिता आवाड, प्राचार्य डॉ. एच.एम.जरे, प्रबंधक श्री. कैलास पाचारणे यांच्या शुभ हस्ते संपन्न झाला.

डॉ. संजय शिंदे
मराठी विभाग प्रमुख




विचारवेध निबंध स्पर्धेत पारितोषिक स्वीकारताना डॉ. संजय शिंदे




विचारवेध निबंध स्पर्धेत पारितोषिक स्वीकारताना मराठी विभागातील द्वितीय वर्षातील विद्यार्थिनी

कु. शितल रौंधळ



विचारवेध निबंध स्पर्धेत पारितोषिक स्वीकारताना प्रथम वर्ष कला शाखेतील विद्यार्थिनी कु. चैताली बोरकर



Savitribai Phule Pune University Affiliation ID. No. PU/PN/ASC/036/1977
Jr. College Code No.: J-11.08.001 M.C.V.C. Code No.: P-057



Founder - President
Late Sahebrao V. Buttepatil
Ex.M.L.A.,Khed

|| प्रज्वालितो ज्ञानमयः प्रदीपः ||
K.T.S.P. Mandal's

Website : www.hrmrajgurunagar.com
Email : hrmrajguru@yahoo.com

# HUTATMA RAJGURU MAHAVIDYALAYA

Ph. : 02135-222099

**ARTS, SCIENCE & COMMERCE**
Rajgurunagar, Tal. Khed, Dist. Pune - 410505
NAAC Reaccredited B Grade

Off.Principal - Dr. H.M.Jare
M.Com.M.Phil,Ph.D.,G.D.C.&A

दि. ९.१.२०२०
जा.क्र. ४८९/१९-20

प्रति,
**मा. श्री. आनंद करंदीकर सो.**
**विचारवेध असोशिएशन**
**पुणे.**

विषय — **विचारवेध निबंध स्पर्धेच्या बक्षीस समारंभाबाबत....**
**संदर्भ — आपले पत्र क्र. ४५८, दि. १७/१२/२०१९**

महोदय,

उपरोक्त संदर्भीत पत्रान्वये विचारवेधच्या वतीने आयोजित निबंध स्पर्धेचा बक्षीस वितरण समारंभ आमच्या महाविद्यालयात आयोजित करण्याविषयी आपण सूचवलं होतं. त्यानुसार आम्ही **मंगळवार दि. १४ जानेवारी २०२० रोजी स. १० वा.** या कार्यक्रमाचे आयोजन करण्याचे निश्चित केले आहे.

आपण या कार्यक्रमास उपस्थित राहून आमच्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करावे, ही विनंती.

आपले विश्वासू,

डॉ. संजय शिंदे
VICE-PRINCIPAL
Arts Faculty,
Hutatma Rajguru Mahavidyalaya
Rajgurunagar, Tal. Khed, Dist. Pune.

प्राचार्य डॉ. एच.एम.जरे
**Officiating Principal**
Hutatma Rajguru Mahavidyalaya
(Arts, Science & Commerce)
Rajgurunagar, Tal.Khed, Dist.Pune.


विचारवेध
विचारवेध संमेलन २०२०, पुणे
प्रशस्तिपत्र
विचारवेध संमेलन २०२० अंतर्गत आयोजित केलेल्या निबंध–मंथनात
संजय ज्ञानदेव शिंदे
यांनी उत्साहाने सहभाग घेतला. अभ्यासपूर्वक आपले विचार व्यक्त केले.
या बद्दल अभिनंदनपूर्वक हे प्रशस्तिपत्र देण्यात येत आहे.
आपले
राम ताकवले
भालचंद्र मुणगेकर
आर. एस. माळी
१ जानेवारी २०२०
पुणे


विचारवेध
विचारवेध संमेलन २०२०, पुणे
प्रशस्तिपत्र
विचारवेध संमेलन २०२० अंतर्गत आयोजित केलेल्या निबंध–मंथनात
रेणू अभिमन्यू सांडभोर
यांनी उत्साहाने सहभाग घेतला. अभ्यासपूर्वक आपले विचार व्यक्त केले.
या बद्दल अभिनंदनपूर्वक हे प्रशस्तिपत्र देण्यात येत आहे.
आपले
राम ताकवले
भालचंद्र मुणगेकर
आर. एस. माळी
१ जानेवारी २०२०
पुणे



विचारवेध

# विचारवेध संमेलन २०२०, पुणे

प्रशस्तिपत्र

विचारवेध संमेलन २०२० अंतर्गत आयोजित केलेल्या निबंध–मंथनात

पूजा लक्ष्मण थोरे

यांनी उत्साहाने सहभाग घेतला. अभ्यासपूर्वक आपले विचार व्यक्त केले.
या बद्दल अभिनंदनपूर्वक हे प्रशस्तिपत्र देण्यात येत आहे.

आपले

राम ताकवले | भालचंद्र मुणगेकर | आर. एस. माळी

१ जानेवारी २०२० पुणे



विचारवेध

# विचारवेध संमेलन २०२०, पुणे

प्रशस्तिपत्र

विचारवेध संमेलन २०२० अंतर्गत आयोजित केलेल्या निबंध–मंथनात

पूजा तुकाराम राऊत

यांनी उत्साहाने सहभाग घेतला. अभ्यासपूर्वक आपले विचार व्यक्त केले.
या बद्दल अभिनंदनपूर्वक हे प्रशस्तिपत्र देण्यात येत आहे.

आपले

राम ताकवले | भालचंद्र मुणगेकर | आर. एस. माळी

१ जानेवारी २०२० पुणे



विचारवेध

# विचारवेध संमेलन २०२०, पुणे

प्रशस्तिपत्र

विचारवेध संमेलन २०२० अंतर्गत आयोजित केलेल्या निबंध–मंथनात

आरती बाळासाहेब विघ्ने

यांनी उत्साहाने सहभाग घेतला. अभ्यासपूर्वक आपले विचार व्यक्त केले.
या बद्दल अभिनंदनपूर्वक हे प्रशस्तिपत्र देण्यात येत आहे.

आपले

राम ताकवले | भालचंद्र मुणगेकर | आर. एस. माळी

१ जानेवारी २०२० पुणे



विचारवेध

# विचारवेध संमेलन २०२०, पुणे

प्रशस्तिपत्र

विचारवेध संमेलन २०२० अंतर्गत आयोजित केलेल्या निबंध–मंथनात

प्रगती बाजीराव उत्तरडे

यांनी उत्साहाने सहभाग घेतला. अभ्यासपूर्वक आपले विचार व्यक्त केले.
या बद्दल अभिनंदनपूर्वक हे प्रशस्तिपत्र देण्यात येत आहे.

आपले

राम ताकवले | भालचंद्र मुणगेकर | आर. एस. माळी

१ जानेवारी २०२० पुणे



विचारवेध

# विचारवेध संमेलन २०२०, पुणे

प्रशस्तिपत्र

विचारवेध संमेलन २०२० अंतर्गत आयोजित केलेल्या निबंध–मंथनात

पराग वेदरत्न शिवदास

यांनी उत्साहाने सहभाग घेतला. अभ्यासपूर्वक आपले विचार व्यक्त केले.
या बद्दल अभिनंदनपूर्वक हे प्रशस्तिपत्र देण्यात येत आहे.

आपले

राम ताकवले | भालचंद्र मुणगेकर | आर. एस. माळी

१ जानेवारी २०२० पुणे



विचारवेध

# विचारवेध संमेलन २०२०, पुणे

प्रशस्तिपत्र

विचारवेध संमेलन २०२० अंतर्गत आयोजित केलेल्या निबंध–मंथनात

ऐश्वर्या शिवाजी भोगाडे

यांनी उत्साहाने सहभाग घेतला. अभ्यासपूर्वक आपले विचार व्यक्त केले.
या बद्दल अभिनंदनपूर्वक हे प्रशस्तिपत्र देण्यात येत आहे.

आपले

राम ताकवले | भालचंद्र मुणगेकर | आर. एस. माळी

१ जानेवारी २०२० पुणे



विचारवेध

# विचारवेध संमेलन २०२०, पुणे

प्रशस्तिपत्र

विचारवेध संमेलन २०२० अंतर्गत आयोजित केलेल्या निबंध–मंथनात

नम्रता विश्वनाथ बनकर

यांनी उत्साहाने सहभाग घेतला. अभ्यासपूर्वक आपले विचार व्यक्त केले.
या बद्दल अभिनंदनपूर्वक हे प्रशस्तिपत्र देण्यात येत आहे.

आपले

राम ताकवले    भालचंद्र मुणगेकर    आर. एस. माळी

१ जानेवारी २०२०    पुणे



विचारवेध

# विचारवेध संमेलन २०२०, पुणे

प्रशस्तिपत्र

विचारवेध संमेलन २०२० अंतर्गत आयोजित केलेल्या निबंध–मंथनात

रूपाली अरुण कोहिनकर

यांनी उत्साहाने सहभाग घेतला. अभ्यासपूर्वक आपले विचार व्यक्त केले.
या बद्दल अभिनंदनपूर्वक हे प्रशस्तिपत्र देण्यात येत आहे.

आपले

राम ताकवले    भालचंद्र मुणगेकर    आर. एस. माळी

१ जानेवारी २०२०    पुणे

विचारवेध, पुणे आयोजित खुली निबंधस्पर्धा ऑक्टो. २०१९.

निबंध विषय - जग कुठे आणि भारत कुठे ?

डॉ. संजय शिंदे, राजगुरुनगर

कोणत्याही देशाच्या मोठेपणाचे मापदंड निश्चित करणं तसं अवघडचं. यासाठी किमान निकष काय लागतात ? भौगोलिक आकार, लोकसंख्या, लष्करी ताकद, सक्षम अर्थव्यवस्था की हे सर्वच ? यातले काही घटक असले आणि नसले तर एखादा देश मोठा होऊ शकत नाही का ? आणि समजा यातले बरेचसे नसले आणि तरीही तो देश मोठ्या देशांत गणला जात असेल तर ते कशामुळे ? अशा अनेक घटकांची चर्चा जग आणि भारताचा तौलानिक विचारात करता येईल. मात्र भारताची पार्श्वभूमी, विविधता आदि मुद्द्यांनाही केंद्रस्थानी ठेवावे लागेल.

ब्रिटिशांनी व्यापार वा साम्राज्य पसरविण्याच्या महत्त्वाकांक्षेमुळे भारताने आपले राजकीय स्वातंत्र्य गमावले व पुढे सांस्कृतिकदृष्ट्या दुय्यम दर्जा स्वीकारला. 'फोडा, झोडा व राज्य करा' या इंग्रजांच्या कुटनीतीचा परिणाम भारताची फाळणी होण्यात झाला. हैद्राबाद-सारखी अनेक संस्थाने भारतात विलीनीकरणासाठी मोठे कष्ट घ्यावे लागले. काश्मिर समस्येची भळभळती जखम भारताला कायमस्वरुपी चिकटली. प्रजासत्ताक भारताला एक सक्षम संविधान मिळाले. पंडित नेहरुंच्या नेतृत्वाखाली लोकशाही समाजवादाच्या माध्यमातून नवभारत उभा करण्याचा प्रयत्न झाला. मात्र पाकिस्तान आणि चीनबरोबर सातत्याने संघर्ष करावा लागला. परिणामी संरक्षणावर अधिकचा खर्च वाढला. १९४५ ते १९९० या काळात जगात निर्माण झालेल्या शितयुध्दात भारताने अलिप्ततावादाची भूमिका घेऊन तिसरा पर्याय स्वीकारला. १९९१ नंतर जागतिकीकरणातून आलेली नवभांडवलशाहीच्या मार्गाने भारताचा प्रवास सुरु झाला. स्वातंत्र्यानंतरच्या सात दशकात भारताची अन्न, वस्त्र, निवारा, शिक्षण, आरोग्य आणि स्वच्छता या मूलभूत गोष्टींची पूर्तता करण्यात बरीचशी शक्ती खर्च झाली.

भारताची अमेरिका, चीन, इंग्लंड आदींच्या जगातील प्रतिष्ठित व प्रगत देशांबरोबर तुलना केली जाते. निकोप समाजव्यवस्थेसाठी तुलनेची गरज असते. पण इंग्लंडमध्ये १३ व्या शतकात राजकीय स्वातंत्र्याचा विचार केला. तर अमेरिका स्वतंत्र होऊनही अडीचशेच्या आसपास वर्ष झालीत. त्यामुळे या देशांत एक परिपक्व राजकीय संस्कृती, लोकशाही निर्माण झाली आहे. या देशांतील नागरिकांच्या मनात राष्ट्रवादाची भावना प्रबळ आहे. भारत या बाबतीत खूपच मागे आहे.

चीनने भौतिक प्रगती साधलेली असली, तरी ती एकपक्षीय हुकूमशाही राजवट आहे. तेथे नागरिकांच्या हक्क आणि अधिकारांना कसलीही किंमत नाही. आज हाँगकाँगमध्ये होत असलेली आंदोलने पाहिल्यावर चीन किती सत्तापिपासू देश आहे, हे समजते. भारतात लोकशाहीच्या माध्यमातून सामाजिक न्यायाला प्राधान्य दिले जाते. पाकिस्तान सोडला तर चीनची शेजारील देशांबरोबर सीमावादाची लढाई सुरु आहे. चीन सातत्याने इतर शेजारी देशांवर लष्करी कुरापती करतो. परंतु भारताने स्वातंत्र्यापासून अजून एकदाही कुणा दुसऱ्यावर स्वतः हून आक्रमण केलेले नाही.

अनेक देश त्यांच्या देशातील अल्पसंख्यांकांना हक्क, अधिकार देऊ शकले नाही. परिणामी त्या देशातील असंख्य अल्पसंख्यांकांना आपली मायभूमी सोडून स्थलांतर करावे लागले. भारताने घटनात्मक चौकटीत राहून अल्पसंख्यांकांच्या अधिकारांचे संरक्षण करण्याची भूमिका सातत्याने घेतली. भारतातील अल्पसंख्यांक देश सोडून गेल्याची माहिती ऐकिवात नाही. भारताच्या शेजारील देशांमध्ये लोकशाही प्रणाली विकसित होऊ शकली नाही. भारताने मात्र जगामध्ये समृद्ध, लोकशाही देश व देदीप्यमान प्राचीन संस्कृती म्हणून आपली स्वतंत्र्य ओळख निर्माण केली आहे.

अर्थात भारतीय संस्कृती कितीही महान आणि इतिहास कितीही उज्ज्वल असला तरी, जगाच्या परिप्रेक्षात आपलं वर्तमान काळवंडलेलं आहे, याकडे

दुर्लक्ष करता येणार नाही. कारण आज जे देश पुढारलेले नि प्रगत आहेत, त्यांनी उर्वरित जगाचे शोषण करण्याचा प्रयत्न केला ही गोष्ट स्वीकारली, तरी त्या पलीकडेही त्या देशांतील समाजांमध्ये काही एक गुण आहेत, ही बाब तेथील शास्त्रज्ञ, कलावंत, लेखक, खेळाडू यांच्या योगदानाकडे पाहून होते. भारतातील राजकीय वातावरणाच्या मर्यादेमुळे उद्योग, साहित्य, क्रीडा अशा अनेक बाबतीत कमी पडताना दिसतो.

जपानसारखा देश दोन अणुबॉम्बची भीषणता सहन करून पुन्हा त्याच तडफेने उभा राहिला. या देशाला नागरिकांच्या कार्यप्रवण राष्ट्रनिष्ठेमुळे जगात ओळख मिळाली. इस्त्रायलसारखा देश भारतानंतर एका वर्षांनी जन्माला आला. भारताच्या तुलनेत मुंबईइतकाही नसलेला हा देश कल्पनाशक्ती, प्रतिभा यांच्या साह्यानं सतत काही ना काही नवीन देत राहण्याच्या क्षमतेने जगातील बड्या देशांत जाऊन बसला. उद्याच्या गरजा लक्षात घेऊन त्यानुसार जगण्याच्या त्या त्या काळात वाकबगार होणारे कुशल? वादी दृष्टिकोनाच्या नागरिकांनी या देशांना पुढे नेले. आपले पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांचंही हेच मत होतं. उद्याचं पाहणारे तज्ञ हवेत. मग आजच्या घडीला इस्त्रायल, जपान कुठे आणि भारत कुठे आहे? भारत मागे का पडतोय? भारतीयांची ताकद खोटा राष्ट्रवाद, धर्म, आरक्षण, पक्षीय राज-कारणातील मोठेपणा सिद्ध करण्यात संपत चाल-लीय. भारतीयांना जात, धर्म उपजत समजतो पण अर्थविचार कळत नाही. जर्मनी आकाराने महाराष्ट्राएवढा आहे पण अर्थव्यवस्थेच्या बाबतीत भारताच्याही पुढे आहे. भारत अंथरुण पाहून पाय पसरावे ही विचारसरणी घेऊन बसलाय. त्यामुळे विस्ताराला मर्यादा आल्या आणि जगाच्या विकासाच्या वेगात आपण खूप मागे पडली आहे.

जगातील अनेक देशांचा विकास प्रभावी शिक्षणव्यवस्थेमुळे झाला. अमेरिका आपल्या राष्ट्रीय उत्पन्नातला प्रचंड वाटा शिक्षणावर खर्च करते. त्यामुळे तिथल्या शाळा सुंदर असतात. शिक्षक समाधानी असतात आणि मुलांनाही हवंहवंसं असं वातावरण असतं. अशा समाजात 'मला शिक्षक व्हायचंय' असं म्हणून शिक्षक होणाऱ्यांची संख्या मोठी असते. भारतासारख्या बाकी काही जमत नाही ..... केलं आपलं बी.एड. / डी.एड. आणि चिकटले शिक्षण म्हणून असं होत नाही. भारतातील प्राथमिक शिक्षणाच्या व विद्यापीठांच्या दर्जा पाहता महासत्तेचे स्वप्न दिवास्वप्न ठरण्याची शक्यता अधिक आहे. आपल्या विदयापीठीय शिक्षणात संशोधनाला वाव मिळत नाही. जगातल्या पहिल्या पाचशे विद्यापीठात भारतातील एकही विद्यापीठ नाही. पारंपरिक व अकुशल अभ्यासक्रमांमुळे दिवसेंदिवस बेरोजगारी मात्र प्रचंड वाढते आहे.

आकारमान, विविधता, सामाजिक प्रश्न या बाबतीत बरंचसं भारताशी साधर्म्य असलेल्या दक्षिण अमेरिकेतील ब्राझील या देशाने शिक्षण, आरोग्य, गरिबी निर्मूलन या क्षेत्रात केलेली प्रगती थक्क करणारी आहे. आरोग्यासाठी ब्राझील प्रती माणसाला ४८३ डॉलर खर्च करतो. भारतात हेच प्रमाण अवघं २९ डॉलर इतकं आहे. आपल्या सरकारी रुग्णालयांची स्थिती व रुग्णांची संख्या पाहता (उदा. मुंबईचे सायन, कुपर इ.) नागरिकांचं आरोग्य रामभरोसे असल्याचे दिसते.

जगात माहिती तंत्रज्ञान क्षेत्रात सर्वाधिक अभियंते भारतीय आहेत; त्याचा आनंद साजरा करत असताना एक प्रश्न मला पडतो. तो हा की, 'माहिती तंत्रज्ञानाच्या क्षेत्रातलं एक तरी उत्पादन भारतीयानं जन्माला घातलं आहे का? मायक्रोसॉफ्ट, ॲपल, गुगल, फेसबुक, ट्विटर, विकिपिडीया, आलेच तर गेला बाजार याहू, आर्कुट ... यादी कितीही वाढवता येईल. यातलं आपलं काय? तेव्हा इतरांनी जन्माला घालायचं आणि

आपणं त्याचं पालनपोषण करायचं हेचं खरं. पण त्याच वेळी नवीन काही जन्माला घालायची ताकद आपण हरवून बसलोय का ?

याची कारणे आपल्या राजकीय धोरणात व नेतृत्वाच्या दृष्टिकोनावर अवलंबून आहेत. १९८४ साली राजीव गांधी यांचा राजकीय क्षितिजावर उदय होई-पर्यंत संगणक हे काय आहे हे भारतीय समाजमनास तितकेसे समजले नव्हते. त्याआधी संगणक आयात करू पाहणाऱ्या टाटा समूहास त्याची परवानगी देखील सरकारने नाकारली होती. का ? तर संगणकास यंत्र मानण्यास आपले सरकार तयार नव्हते. तरीही जे संगणक आयात करू इच्छित आहे त्यांच्यावर मूळ किमतीच्या ३०० टक्के इतका प्रचंड कर आकारला जात असे. त्यामुळे संगणक क्षेत्रात करिअर करणाऱ्या भारतीय तरुणांनी अमेरिकेचा रस्ता धरला. प्रचंड गुणवत्ता भारताबाहेर गेली. अर्थात ही पिढी भारतात राहिली असती तर राखीव जागांपासून ते माणास आर्थिक धोरणांपर्यंत सरकारी दगडावरती डोके आपटून कपाळमोक्ष करून घेण्याची वेळ त्यांच्यावर आली असती. गुणवंतांची कदर करणे आपणास समाज म्हणून जमत नाही. म्हणून गुगलचे सीइओ सुंदर पिचई, मायक्रोसॉफ्टचे सत्या नाडेला असे अनेक सत्य, सुंदर संधी विना बाहेर गेले.

जगाच्या तुलनेत आर्थिक महासत्तेची स्वप्न पाहणाऱ्या भारताची कितीतरी जनता आजही उघड्या-वर शौचास बसते. ज्या देशात ११८ कोटीहून अधिक मोबाइल फोन आहेत, त्याच देशातील पन्नास टक्क्यां-हून अधिक लोकांना आजही स्वच्छ पिण्याच्या पाण्याची सुविधा उपलब्ध नाही. चंद्रावर तिरंगा फडकवण्याची संधी थोडक्यात हुकलेल्या या देशात आजही कित्येक कोटी जनता अंधारात आहे. बालहत्या, कुपोषण, भूक, स्त्री-भ्रूणहत्या, साक्षरता, सार्वत्रिक लसीकरण, प्राथमिक आरोग्य या बाबतीत भारताची पिछाडी एकविसाव्या शतकातील दुसरे दशक संपत आले तरी कायम आहे.

आपल्या शेजारील बांगलादेशाची कामगिरी या बाबतीत सरस आहे. आणि आपण मात्र मानव विकास निर्देशांक पाकिस्तानपेक्षा काही अंक पुढे आहे, यातच समाधानी आहोत. त्यामुळे एक फार मोठा वर्ग आजही जर सर्वांगीण विकास, शिक्षण, आरोग्य यांपासून दूर असेल तर भारताच्या विकासाबाबतचा प्रश्न सामाजिक की आर्थिक याहीपेक्षा नैतिक अधिक आहे, असे माझे मत आहे.

देशादेशातील मुख्य फरक निघल्या घटनात्मक संस्था, सामाजिक चौकटी व कायद्याचं पालन यावर अवलंबून असतो. एखादा चांगला नेता लोकाभिमुख राज्य करेल .... दुष्ट प्रवृत्तीचा नेता लोकांची पिळवणूक करेल ... परिणामी, देशाचं भवितव्य नेत्याच्या व्यक्तीगत गुणदोषांवर अवलंबून राहील. म्हणून युरोपने घटनात्मक संस्था बांधणीवर भर दिला. परिणामी व्यक्तिगत नेत्यांचा प्रभाव जास्त राहिला नाही. ब्रिटनमध्ये मार्गारेट थॅचर, टोनी ब्लेअर यांनी आपले अधिकार वाढवण्याचा प्रयत्न केला, तेव्हा त्यांच्याच पक्षांनी त्यांची हकालपट्टी केली. भारतात सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायाधिशांनाच पत्रकार परिषद घेऊन आपल्यावरील अन्यायाचा पाढा वाचावा लागतोय. सीबीआयचे दोन संचालक एकमेकांवर गंभीर आरोप करतात. रिजर्व बँकेचे दोन गव्हर्नर एकापाठोपाठ मुदतीपूर्वी राजीनामा देतात. अनेक उद्योगपती हजारो कोटींचे कर्ज बुडवून परदेशात पळून जातात. भारतातील व्यवस्थानिर्मितीचे हे अपयश आहे.

अमेरिकेचे तत्कालीन राष्ट्राध्यक्ष जॉर्ज बुश यांची कन्या ड्रंक आणि ड्राईव्ह प्रकरणात २४ तास तुरुंगात होती. तिला अटक करणाऱ्याची बदली आपल्यासारखी राजकीय दबावातून गडचिरोली अथवा तत्सम ठिकाणी होत नाही. याचे कारण व्यवस्थेचे मजबुतीकरण. त्यामुळे व्यवस्थेतील माणसांना काम करताना भीती वाटत नाही. आपल्या देशात सीबीआयसारख्या संस्था सत्ताधाऱ्यांच्या दावनीला बांधल्या जातात. राजकर्त्यांना

कायदा हात लावत नाही. नियम मोडण्याच्या क्षमतेचा संबंध व्यक्तीच्या कर्तृत्वाशी जोडला जातो. पक्षांतराचे चित्र तर दुर्दैवी आहे. आपल्याकडे राजकारण हेच सत्ताकारण आहे.

जगात शास्त्रीय शोधांचा पाठपुरावा, तांत्रिक कौशल्य, कल्पकता, आर्थिक गुंतवणूक अशा अनेक गोष्टींमधून छोटे मोठे उदयोग उभे राहिले. विसाव्या शतकात अमेरिका, युरोपमध्ये औदयोगिक क्रांतीने कळस गाठला व तिथे समृद्धीचे तेल अळक लागले. प्रचंड घरणां, औदयोगिक प्रकल्प ही नवीन अर्थरचनेतील तीर्थक्षेत्र बनली. बिल गेट्स, स्टीव्ह जॉब्ज, ओकियो मोरिता, फिलिप्स बंधू, कार्ल बेन्स, मार्क झुकेनबर्ग अशा अनेक कल्पक लघुउदयोजकांपासून ते आजच्या संगणक सम्राटांपर्यंतच्या उदयोजकांचा इतिहास नेत्रदिपक आहे. भारतात औदयोगिक विकासाच्या पाया घालणारे जमशेटजी टाटा, घनःश्यामदास बिर्ला, धीरुभाई अंबानी, राहूल बजाज, नारायणमूर्ती अशी काही सन्माननीय नावे आदराने घेता येतात. पण बऱ्याचदा राजकीय आशीर्वादामुळे एखादा अंबानीच मोठा झालेला दिसतो. परिणामी राजकीय हस्तक्षेप व राजकीय नेतृत्वाच्या खाजगी हितसंबंधामुळे एअर इंडिया, बीएसएनएल सारख्या सरकारी कंपन्या रसातळाला जातात. 'जाणार' यांसारख्या प्रकल्पांना होणारा विरोध हा केवळ 'राजकीय' असतो.

जगातील क्रिकेट, फूटबॉल, बॉस्केटबॉल-सारखे मैदानी आणि सांघिक खेळ, टेनिस, बॅडमिंटन, गोल्फ, बॉक्सिंग, जलतरणसारखे वैयक्तीक क्षमतेची कसोटी पाहणारे खेळ, बौद्धिक क्षमतेची कसोटी पाहणारा बुद्धिबळासारखा खेळ, जिम्नॅस्टीक, ॲथलेटिक्स, अशा अनेक खेळांना व्यावसायिक रुप आले आहे. या ऑलिंपिक स्पर्धेमध्ये अमेरिका, चीन, रशिया बरोबरच महाराष्ट्रापेक्षा आकाराने व लोकसंख्येने कमी असलेले देश पदकांच्या खजिना लुटताना दिसतात. सव्वाशे कोटी लोकांचा भारत पदकांपासून दूर असतो. गेल्या काही वर्षात भारतीय खेळाडू सांघिक

०७.

क्रीडाप्रकारांत चमकत असले तरी वैयक्तिक स्पर्धेतच भारताला पदकांची आशा अधिक असते. भारताच्या सामाजिक रचनेवर भाष्य करणारी अशीच ही गोष्ट आहे. देश एकीकडे विश्वगुरु बनण्याची स्वप्न पाहात असताना आपले सांघिक यश समजून घ्यायला हवे.

संयुक्त राष्ट्रसंघाने जागतिक सुख-समाधान निर्देशांकानुसार १५८ देशांचा सर्वे करुन क्रमवारी जाहीर केली. त्यासाठी राष्ट्रीय उत्पन्न, आयुमान मर्यादा, सामाजिक आधार, भ्रष्टाचार, औदार्य व जीवनातील पर्यायांच्या ~~निवडीतील पर्यायांच्या~~ निवडीतील स्वातंत्र्य या निकषांचा विचार केला. यात स्वित्झर्लंडचा प्रथम क्रमांक आला. पाकिस्तान ८१ वा, पॅलेस्टाईन १०८ व बांग्लादेशाचा १०९ वा क्रमांक तर भारताचे स्थान ११७ वे आहे. याचे कारण आपण सरकारकडून खूप अपेक्षा ठेवतो, यात आहे.

राजकीय नेत्यांबरोबरचं नागरिकाचं आपल्या देशाप्रती असलेले उत्तरदायित्व देशाला विकासाच्या दिशेने नेणारे असते. स्वित्झर्लंडमध्ये त्या देशातील घटनेनुसार कोणत्याही विषयावर किमान लाखभर लोकांनी लेखी मागणी केली की त्यावर जनमताचा कौल घेणं सरकारला बंधनकारक असतो. गेल्या वर्षी तिथल्या एका संस्थेने देशातल्या आर्थिक विषमतेचा आढावा घेऊन तिथल्या नागरिकाला दरमहा २५०० स्विस म्हणजे आपल्याकडचे १ लाख ७३ हजार रुपये सरकारने आपल्या तिजोरीतून द्यावे अशी मागणी केली. लाखभराहून अधिक नागरिकांनी अनुमोदन दिले. या प्रस्तावावर स्विस सरकारने जनमत चाचणी घेतली आणि आश्चर्य म्हणजे तब्बल ८० टक्के नागरिकांनी हा ऐतखाऊ प्रस्ताव फेटाळून लावला. नागरिकांनी दारी आयती चालून आलेली लक्ष्मी नाकारली हे वास्तव कल्पनेपेक्षाही अद्‌भूत होत. 'सरकार काय ऐतखाऊ समजलं का आम्हाला ?', आमचे आम्ही कमवायला सक्षम आहोत.' हरून जावं असं हे जनमताचं शहाणपण, अनुदान,

कर्जमाफी, आरक्षण, हक्काची पदोन्नती वगैरे त्यांना काहीच माहीत नाही. आपल्याकडे निवडणुकीत बँक खात्यात १५ लाख देणार अशा घोषणा दिल्या जातात. आपल्याला हे शहाणपण कधी येणार ? 'मला काय करायचंय' ही आपली वृत्ती कमी व्हायला हवी.

जगाच्या तुलनेत औद्योगिकदृष्ट्या विकसित नसला तरी शांतताप्रिय आणि स्वातंत्र्य, समता, सामाजिक न्याय आदि मूल्यांची जोपासना करणारा देश म्हणून भारताची ओळख आहे. मात्र जगाच्या तुलनेत भारत कुठेच कसा नाही. भारतात नवीन काही खासं घडतं नाही. जे घडतयं ते जगाच्या वेगात खूप मागे आहे. जात, धर्म, प्रांत भाषा याच गोष्टींत भारत अडकून पडतोय. नेतृत्वाची दृष्टी संकुचित होताना दिसते. कोणत्याही देशाला सर्वांगीणदृष्ट्या विकसित व्हायचे असेल तर छाती पिटणारा राष्ट्रवाद आणि राष्ट्रउभारणी या दोन भिन्न गोष्टी आहेत असे अमेरिकेचे माजी अध्यक्ष बराक ओबामांनी त्यांच्या निरोपाच्या भाषणात (दि. ११ जानेवारी २०१७ रोजी) जे नमूद केले ते भारताच्या भविष्यासाठी खूप सूचक आहे.

—×○—×○—×○—×○—

निबंध लेखक - डॉ. संजय ज्ञानदेव शिंदे
मराठी विभाग
हुतात्मा राजगुरु महाविद्यालय, राजगुरुनगर
ता. खेड, जि. पुणे: पिन - ४१०५०५
मोबा. क्र. ९६०४३०९०६०
मेल आयडी. dr.sdshinde80@gmail.com

एकूण शब्दसंख्या - १८४२